




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३५५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०५ ऑगस्ट २०२५


## दिवा मनसेचा मोठा विजय !

## हिंदी शिकवणाऱ्या त्या शाळांना कारणे दाखवा नोटीस



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील शाळांमध्ये हिंदी भाषा शिकवली जात असल्याच्या विषयावर मागच्या आठवड्यात दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मनसे नेते अविनाश जाधव आणि दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महानगरपालिका शिक्षण अधिकाऱ्यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली होती. त्यानुसार दिव्यातील न्यू गुरुकुल शाळा, माय मदर शाळा, सिम्बॉय्सिस शाळा दातिवली, ग्लोबल शाळा आणि साऊथ इंडियन शाळा या शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच इतर शाळांना हिंदी भाषा विषय न शिकवण्याच्या बाबतीत आदेश देण्यात आले आहेत.

## 'विंचूर'मध्ये मोकाट जनावरांमुळे घबराट

### वाहन चालकासह पादचारी यांच्यावर होत आहेत हल्ले !



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** विंचूर शहरातील अनेक भागातील विविध प्रमुख रस्त्यावर मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून, या जनावरांमुळे प्रमुख रस्त्यावर झुंडी करून ठाण मांडून बसलेले असतात. यामुळे वाहनधारक पादचारी त्रस्त झाले आहे. अनेक प्रमुख भागातील यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. मोकाट जनावरांमुळे सातत्याने अपघात होत आहेत. तसेच लहान मुले यांच्यावर हल्ले होत आहे. विंचूर ग्रामपालिका प्रशासनाने मोकाट जनावरे पकडण्याची व दंडाची मोहीम राबवावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. विंचूर शहरातील ग्रामपालिका, जिल्हा परिषद शाळा, सिद्धार्थ नगर, बाजारपेठ, बजरंग मंडळ, नेहरू चौक, मारवाडी पेठ अशा वेगवेगळ्या भागातील रस्त्यावर जणू काही जनावरांचे साम्राज्य असल्यासारखी परिस्थिती असते. त्यामुळे वाहन चालकासह पायी चालणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास व भीती सहन करावी लागत आहे. तरी विंचूर ग्रामपलिका प्रशासनाने लवकरात लवकर मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी विंचूर ग्रामस्थांनी केली आहे.

> शाळा सुटल्यावर लहान मुले खूप दहशतीमध्ये घरी जात असतात. कधी हे सांड मारतील याचा भरोसाच नाही. वाहन चालकांवर डायरेक्ट धावून जात आहे. विंचूर गावात या सांडांची दहशत झाली आहे. तरी ग्रामपालिकेने याचा लवकर बंदोबस्त करावा.
>
> **- बाळासाहेब चव्हाण,** विंचूर ग्रामस्थ

## 'खालिद का शिवाजी' चित्रपटावर बंदी घाला !

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०४, मुंबई :** 'खालिद का शिवाजी' या आगामी मराठी चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या खोटी, तथ्यहीन व विकृत माहिती देऊन समस्त जनतेची दिशाभूल केली आहे. या विकृत प्रचारामुळे समस्त शिवप्रेमींच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. ज्याप्रमाणे "उदयपूर फाइल्स : कन्हैय्यालाल टेलर मर्डर" या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यावर अंतरिम बंदी आणण्यात आली, त्याचप्रमाणे "खालिद का शिवाजी" या चित्रपटावर देखील बंदी घालण्यात यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्य व केंद्र सरकारकडे केली आहे.

## राज्यात अवयवदान पंधरवड्यास सुरुवात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** राज्यातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी आजपासून विविध उपक्रमांनी अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि या अभियानाचा शुभारंभ केला. राज्यातील जनतेने या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले आहे.

अंगदान जीवनदान संजीवनी अभियान ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या कालावधीत व्यापक जनजागृती व समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे निर्देश मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत.

या अभियानामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. अवयवदान क्षेत्रात देश आणि राज्य स्तरावर काम करणाऱ्या संस्था रोट्टो, सोट्टो, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्यां व झेडटीसीसी, मुंबई, पुणे नागपूर व छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने हे अभियान राज्यभरात राबविण्यात येणार आहे.

## भारताने विजयासह रचला इतिहास, ९३ वर्षांत पहिल्यांदाच घडली ही गोष्ट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, ओव्हल :** भारताने पाचव्या कसोटी सामन्यात थरारक विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिकेत बलाढ्य इंग्लंडशी १-१ अशी बरोबरी साधली. पण या विजयासह आता भारताच्या संघाने इतिहास रचला आहे. कारण गेल्या ९३ वर्षांत जी गोष्ट कधीच घडली नव्हती, ती यावेळी घडल्याचे पाहायला मिळाली आहे.

पाचवा कसोटी सामना भारत जिंकेल, असे कोणालाही वाटत नव्हते. कारण भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ३७४ धावांचे आव्हान ठेवले होते. पण इंग्लंडच्या हॅरी ब्रुक्स आणि जो रूट यांनी शतकं झळकावली. त्यामुळे इंग्लंडच्या संघाने ३ बाद ३०१ अशी दमदार मजल मारली होती. इंग्लंडला जिंकायला फक्त ७३ धाा हव्या होत्या आणि त्यांचे सात फलंदाज शिल्लक होते. पण त्यानंतर भारताच्या खेळाडूंनी हार मानली नाही, अचूक ठिकाणी त्यांनी चेंडू टाकल आणि त्यामुळेच त्यांना विजय मिळवता आला. भारतासाठी हा विजय सर्वात महत्वाचा ठरला आहे, कारण गेल्या ९३ वर्षांत भारताला असा विजय कधीच मिळवता आला नाही.

भारताने आतापर्यंत बरेच विजय साकारले, त्यामध्ये १९७१ चा वेस्ट इंडिज दौरा असो, त्यानंतर इंग्लंडचा दौरा असो, ऑस्ट्रेलियात रचलेला इतिहास असो.. आतापर्यंत बरेच अविस्मरणीय विजय भारताने साकारले. पण तरीही हा विजय भारतासाठी सर्वात महत्वाचा ठरला आहे. कारण यावेळी भारताने जसा विजय साकारला, तसा त्यांना गेल्या ९३ वर्षांत साकारता आलेला नाही. यापूर्वी भारताचा सर्वात थरारक विजय हा १३ धावांनी झाला होता. भारताने ऑस्ट्रेलियाला २००४ साली मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पराभूत केले होते. पण या सामन्यात भारताने इंग्लंडवर फक्त सहा धावांनी विजय साकारला. भारताच्या ९३ वर्षांच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासात भारताने कधीही सिंगल डिजिट धावांमध्ये विजय साकारता आला नव्हता, यापूर्वीचे सर्व विजय १० पेक्षा जास्त धावांनी मिळवले होते. पण यावेळी भारताला ९३ वर्षांत पहिल्यांदाच १० पेक्षा कमी धावांनी संघाला विजय मिळवता आला आहे.

भारताने इंग्लंडवर रोमहर्षक विजय साकारताना इतिहास रचला आहे. भारताने यापूर्वी असा विजय गेल्या ९३ वर्षांच्या इतिहासात कधीच मिळवलेला नव्हता.

## मुदखेडच्या मुख्याधिकाऱ्यांना काँग्रेसचा दणका! शैलेश फडसे यांची तडकाफडकी बदली

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यावर काँग्रेस चे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी अकार्यक्षमतेचा तसेच राजकीय अभय असल्याचा ठपका ठेवून बदली करण्याची मागणी नगर विकास मंत्रालयाकडे केली होती. या तक्रारीची तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदलीचे आदेश धडकताच राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे अर्धापूर नगरपंचायत मध्ये सेवेत कार्यरत असताना कायमस्वरूपी पाणी पुरवठ्याची एक योजना अपूर्ण असताना दुसरी योजना मंजूर करून कोट्यावधीं रुपये खर्च करूनही दोन्हीही योजना अपूर्ण अवस्थेत असल्याची गंभीर बाब निवेदनात नमूद केली होती. या शिवाय शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न आमदार यांनी विधानसभेत उपस्थित करून लक्ष वेधले होते. याशिवाय विधानसभा निवडणुकीत मतदारांना कोंडून



ठेवण्याचा प्रयत्न झाला असताना निवडणूक अधिकारी म्हणून कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही हे कितपत योग्य आहे..? असे निवेदनात नमूद केले होते. मुदखडे नगर परिषदेच्या प्रभारी पदाचा कारभारही शैलेश फडसे यांच्याकडे होता.

प्रभारी पदावर कार्यरत असताना अनेक कामे रखडली होती. ४२ कोटींची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना अजूनही कार्यान्वित झाली नसून नागरिकांना स्वच्छ पाण्याची प्रतीक्षाच करावी लागत आहे. आगामी काळात नगरपालिका निवडणुका होत असल्याने राजकीय फायदा उचलण्यासाठी त्यांचे नियुक्ती करण्यात आली असल्याचा आरोप गोडसे यांनी केला याशिवाय शहरात कोट्यावधी रुपयांचे रस्त्याचे कामे सुरू असुन अत्यंत निकृष्ट दर्जाचे कामांना राजकीय अभय असलेल्या गुत्तेदारांना पाठीशी घातले जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

प्रशासकीय दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांचां प्रशासकीय आलेख जाणून घेऊन तातडीने बदली करण्याची मागणी प्रधान सचिवांकडे केली होती. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनीयमन तसेच शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियमन २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार मुख्याधिकारी गट अ संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने बदली करण्यात येत असल्याचे पत्र जारी केले आहे . बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदावर रुजू होण्याचे आदेश करण्यात आले आहे. या बदलीने राजकीय वर्तुळात एकच खळबड उडाली आहे.

## संपूर्णत: अभियानात उत्कृष्ट कामगिरीबद्दल चंद्रपूर जिल्हाधिकारी सन्मानित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** आकांक्षित जिल्हे व तालुके कार्यक्रम ांतर्गत १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या संपूर्णत: अभियानात उल्लेखनीय काम गिरीबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या वतीने प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला.

हा सन्मान नागपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात पार पडलेल्या राज्यस्तरीय सन्मान समारंभात प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी गौडा यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याने संपूर्णत: अभियानातील



सहापैकी सहा इंडिकेटर्स पूर्ण केले. विशेष बाब म्हणजे यापैकी तीन इंडिकेटर्स आरोग्य विभागाशी संबंधित असून ते १०० टक्के समृद्ध करण्यात आले होते.

समारंभप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार देवरा, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अप्पर मुख्य सचिव (नियोजन) राजकुमार उपस्थित होते. यावेळी जीवती तालुक्यातील यशस्वी सहभागाचे प्रतिनिधीत्व करत गटविकास अधिकारी लक्ष्मीनारायण दोडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील टेंभे, आकांक्षित तालुका समन्वयक गणेश चिंटकुंटलवार व 'उमेद'चे राजेजी दुधे यांनीही सन्मान स्वीकारला.

या यशामध्ये जिल्हा परिषद चंद्रपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय समन्वयक यांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरले. विशेषतः जीवती तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिद्द, चिकाटी व समर्पण भावनेने केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली.

## कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचे आदरातिथ्य ऊर्जा देणारे : घनश्याम मुलचंदानी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, बल्लारपूर (चंद्रपूर) :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ने राजकीय वाटचालीत अनेक चढउतार अनुभवले आहे. मात्र, आजही सर्वसामान्य जनता कॉंग्रेसच्या पाठीशी आहे. काही सत्ताधारी पक्षाच्या दडपणाखाली आले आहे. परिणामी त्यांनी कॉंग्रेस पक्षासोबत फारकत घेतली आहे. परंतु चाळीस वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत मी कांग्रेस सोबत एकनिष्ठ आहे. त्यामुळे मला राज्य पातळीवर संधी मिळाली आहे. कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचे आदरातिथ्य




मला ऊर्जा देणारे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नवनिर्वाचित सचिव घनश्याम मुलचंदानी यांनी बल्लारपूर येथील सत्कार समारंभात केले. बल्लारपूर शहर व तालुका कॅांग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सचिव पदी घनश्याम मुलचंदानी यांची नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी मंचावर प्रदेश काँग्रेसचे नवनिर्वाचित सचिव घनश्याम मुलचंदानी, माजी नगराध्यक्ष डॉ. रजनी हजारे, मध्यवर्ती बँक चे संचालक डॉ. अनिल वाढई, शहर कॅांग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र आर्य, तालुका कॅांग्रेसचे अध्यक्ष गोविंदा उपरे, माजी अध्यक्ष अब्दुल करीम, माजी नगराध्यक्ष दिलीप माकोडे, सुनंदा आत्राम, छाया मडावी, अफसाना सय्यद, डेव्हीड कामपेल्ली, नरसिंह रेब्बावार, प्राणेश अमराज यांची उपस्थिती होती. दरम्यान विविध सामाजिक संस्था, कॅांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित महाराष्ट्र प्रदेश सचिव घनश्याम मुलचंदानी यांचा नागरी सत्कार केला. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक शहर काँग्रेस अध्यक्ष देवेंद्र आर्य यांनी केले. संचालन नरेश मुदंडा यांनी केले. आभार प्रदर्शन ॲड.पवन मेश्राम यांनी केले. यावेळी शहर व ग्रामीण भागातील कांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.




## सावधानता हेच धोरण !

नयनरम्य निळ्याशार रंगाचा लोभसवाणा समुद्र, त्या निळ्या पाण्यात फिरणारे रंगीबेरंगी इवले इवले मासे, लांबपर्यंत चालता येईल असा स्वच्छ किनारा आदी गोष्टींमुळे जगभरातील पर्यटकांना मालदीवचे आकर्षण असते. या मालदीवचे स्थान भारताच्या लक्षद्वीप बेटांजवळ आणि आंतरराष्ट्रीय जहाज मार्गाजवळ असल्याने तो देश भारतासाठी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मालदीव दौरा नुकताच झाला. या दौऱ्यानंतर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे - मालदीव आता भारतासाठी खरेच विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो का? भौगोलिक जवळीक, सांस्कृतिक जुळवाजुळव आणि अनेक दशकांची मैत्री असतानाही आज मालदीवच्या राजकीय आणि धोरणात्मक उतार-चढावांमुळे हा संबंध नव्याने तपासण्याची गरज भासते आहे. मालदीवची सुरुवातीची वसाहत भारतीय उपखंडातील आणि श्रीलंकेतील द्रविडीय समद्रमार्गिक लोकांनी केली होती. या स्थलांतरामुळे तेथे आरंभी हिंदू आणि नंतर बौद्ध संस्कृती पसरली. कालांतराने ११५३मध्ये इस्लाम धर्माचा स्वीकार झाल्यानंतर या देशाला एक नवीन ओळख मिळाली. हिंद महासागरातील एक लहान, परंतु धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असा हा देश आहे. सुमारे १,१९२ प्रवाळ बेटे असलेल्या या देशात २६ अटॉल आहेत, ज्यापैकी फक्त २०० बेटांवर लोकवस्ती आहे. १९६५मध्ये मालदीवला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यास मान्यता देणाऱ्या देशांत भारत पहिला होता. या घटनेने दोन देशांच्या दरम्यान मैत्रीचा पाया रचला गेला. सन १९८८मध्ये मालदीवच्या सुरक्षेसाठी भारताने 'ऑपरेशन कॅक्टस' अंतर्गत लष्करी हस्तक्षेप करून राष्ट्रपती मौमून अब्दुल गयूम यांना वाचवले. या निर्णायक हस्तक्षेपामुळे दोन्ही देशांमधील विश्वास आणि सहकार्य वाढीला लागले. तसे पाहिले तर भारताने मालदीवला मदतीचा आणि संरक्षणाचा अव्याहत ओघ सन १९६५पासून - मधल्या एक-दोन वर्षांचा अपवाद वगळता - आजतागायत सुरू ठेवला आहे. त्या देशातील पायाभूत सुविधांचा विकास, अन्नधान्य, संरक्षण विषयक सामुग्री, आर्थिक मदत यांसाठी भारताने अनेकदा पुढाकार घेतला. सन २००४मधील त्सुनामी आणि करोना साथीच्या काळातदेखील भारताने मालदीवला प्रचंड प्रमाणात मदत केली होती. त्यात वैद्यकीय आणि आर्थिक अशा दोन्हींचा समावेश होता. एकंदरीत या देशाला जणू भारताने फुकट खिरापतच वाटली; पण त्याचे सोने झाले नाही. कट्टरता अणि चीनसारख्या देशांचा प्रभाव, आर्थिक लालसा यामुळे या देशाची अवस्था समुद्रातील बिन शिडाच्या जहाजासारखी झाली आहे. सतत दुसऱ्याच्या जिवावर अवलंबून राहायचे अणि एक दिवस त्याच्याच जिवावर उठायचे, अशी वृत्ती असणारा हा देश आहे.

मालदीवचे रूपडे कालपरत्वे बदलत गेले. सन २०१३ ते २०१८ या काळात राष्ट्राध्यक्ष अब्दुल्ला यामीन यांच्या कारकिर्दीत मालदीवने चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' अंतर्गत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक स्वीकारण्यास सुरुवात केली. 'चीन-मालदीव मैत्री पूल'सारख्या प्रकल्पांनी चीनचा त्या देशातील प्रभाव वाढू लागला. त्यातून पुढे मालदीव कर्जाच्या विळख्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली. काही विश्लेषकांचे असे मत आहे, की या प्रकल्पांच्या माध्यमातून मालदीवच्या आर्थिक स्वातंत्र्यावरदेखील दबाव निर्माण झाला आहे. सन २०१८-२०२३च्या कार्यकाळात इब्राहीम सोलिह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुन्हा भारताकडे कल दाखवला. पण स्वार्थी मालदीवला केवळ चीनसोबतच नाही तर पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि यूएईसारख्या देशांसोबतही जवळीक वाढवायची होती. ज्याच्याकडे जे मिळेल ते घ्यायचे, हात पसरायचे ही वृत्ती.

# हिंदू धर्माचे महत्व जाणा !

राज्यातील एका पक्षाचे नेते आणि माजी मंत्री यांनी सनातन धर्मावर ज्ञान पाजळल्याचा एक व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर व्हायरल झालेला पाहायला मिळाला. हिंदू धर्मात जन्म घेऊनही आपले राजकीय जीवन एका पंथाची तळी उचलण्यातच व्यय केलेल्या आणि त्यांचे भविष्यही त्यांच्याच मतांवर अवलंबून असलेल्या अशा नेत्यांकडून जनतेला वेगळे काही अपेक्षित नसल्याने या व्हिडिओला कोणी गांभीर्याने घेतलेले नाही. सनातन हिंदू धर्म जेव्हढा पुरातन आहे तितकाच वैभवशाली आहे. सनातन धर्मातील समृद्ध ग्रंथसंपदा हे त्याचे आणखी एक प्रमुख गुणवैशिष्ट्य आहे.

आज युरोपीय देश भारतीय संस्कृतीचा गाभा असलेल्या ग्रंथांचा अभ्यास करून त्यावर संशोधन करतात तर दुसरीकडे ज्या भारतात या ग्रंथांचा उगम झाला त्या भारतात या ग्रंथांतील संदर्भ शालेय अभ्याक्रमात शिकवायचे कि नाहीत यावर वादविवाद होतात. प्राचीन ग्रंथसंपदा ही भारताला लाभलेली अनमोल देणगी आहे, तिचे मूल्य पाश्चात्यांनी जाणले. त्यांचा सखोल अभ्यास करून ते त्याची जोड आधुनिक विज्ञानाला देत आहेत आणि आपल्याकडे या ग्रंथांचा अभ्यास करणाऱ्यांना रूढीवादी, बुरसटलेल्या विचारांचे म्हणून हिणवले जात आहे. आपल्या संविधानाने पंथनिरपेक्ष शासनप्रणाली स्वीकारल्याने एकाच धर्मातील शिकवण शालेय अभ्यासक्रमात शिकवता येणार नाही म्हणून तथाकथित बुद्धीप्रामाण्यवादी आणि नास्तिक मंडळी त्याला कडाडून विरोध करतात. मात्र खऱ्या अर्थाने नैतिकता, मानवी मूल्ये आणि आदर्श जीवनशैली यांची शिकवण देणारी, मानवाचा सर्वांगीण विकास साधणारी शिकवण याच ग्रंथ संपदेतून मिळते हे या महाभागांना कोण सांगणार ? ज्या काळात ही समृद्ध ग्रंथसंपदा निर्माण झाली त्यावेळी या विश्वात किती पंथ अस्तित्वात होते ? आज जगभरात ज्या ज्या पंथांची लोकसंख्या बेसुमार झाली आहे त्या सर्वच पंथांचा उगम केव्हा झाला हे आपल्याला ज्ञात आहे आणि या सर्वांच्या आधीपासून सनातन हिंदू धर्म अस्तित्वात आहे याचे पुरेसे दाखले आज उपलब्ध आहेत. १९७६ साली तत्कालीन सरकारने भारतात आणीबाणी लावून समस्त विरोधी पक्षाच्या नेतेमंडळींना तुरुंगात डांबले आणि संविधानाच्या प्रस्तावनेत पालट करून त्यामध्ये 'पंथनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे दोन शब्द घुसडले.




याचा अर्थ १९७६ च्या आधी संविधानाने सुद्धा बहुसंख्याक हिंदू हितालाच प्राधान्य दिले होते. संविधानात 'पंथनिरपेक्ष' अर्थात सेक्युलर शब्द घुसडल्यापासून सेक्युलॅरिजमच्या नावाखाली या देशात बहुसंख्य हिंदूंना पद्धतशीरपणे दुय्यम वागणूक दिली जात आहे. बहुसंख्य असूनही हिंदूंना त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढावे लागत आहे, सरकार दरबारी अर्ज आणि विनवण्या कराव्या लागत आहेत. या सेक्युलॅरिजमचाच परिणाम म्हणून कि काय गेल्या काही वर्षांत देशातील हिंदूंची संख्या ८ टक्याने घटली आहे तर मुस्लिमांची संख्या तब्बल ४३.२ टक्यांनी वाढली आहे. असेच चालत राहिले तर येणाऱ्या काळात हिंदुस्थानातून हिंदू नामशेष होण्यास वेळ लागणार नाही. भविष्यात हिंदूंच्या धर्मग्रंथांचा, वेद उपनिषिदांचा अभ्यास करून पाश्चिमात्य देशातील मंडळी आपल्यालाच आदर्श जीवन कसे जगावे याचे धडे देण्यासाठी भारतात येतील. आपल्या परमभाग्याने लाभलेल्या या लेखनसंपत्तीचे मोल आपण केव्हा जाणणार ? आजमितीला कोणतेही यान अवकाशात सोडायचे असेल, तर त्या अभियानात अडथळे येऊ नयेत यासाठी इस्रोचे शास्त्रज्ञ त्याची प्रतिकृती तिरुपती बालाजीच्या चरणी अर्पण करतात. असे केल्याने भगवंत त्या अभियानातील अडथळे दूर करतो अशी त्यांची श्रद्धा आहे. नासाच्या अंतराळवीर भारतीय वंशाच्या सुनीता विलयम्स अंतराळात जाण्यापूर्वी श्री गणेश मूर्तीचे मनोभावे पूजन करतात. अंतराळात जाताना सोबत त्या श्रीमद्भगवद्गीतेची प्रत घेऊन जातात. या शास्त्रज्ञांना जे कळते त्याहून आपल्याला अधिक कळते का ? वर उल्लेख केल्याप्रमाणे सनातन हिंदु धर्म हा शब्दप्रमाणावर आधारित आहे तरीही काही मंडळी हिंदु धर्मातील सण, उत्सव, व्रत वैकल्ये यामागील शास्त्र जाणून घेऊन ती योग्य रीतीने साजरी करण्याऐवजी मनाला वाटेल त्याप्रमाणे करतात. अशाने इच्छित लाभ होणार आहे का?

अन्य पंथीयांना त्यांच्या प्रार्थना स्थळांतून त्यांच्या पंथाचे ज्ञान दिले जाते त्यामुळे ही मंडळी लहानपणापासून त्यांच्या त्यांच्या पंथाविषयी अभिमान बाळगतात. हिंदूंसाठी मात्र तशी कोणतीच सोय नाही. पूर्वीच्या काळात देशात गुरुकुल पद्धती होती. गुरुकुलात प्रत्येक विद्यार्थ्याला धार्मिक आणि व्यावहारिक ज्ञान दिले जात असे.

आजही भारतात काही प्रमाणात गुरुकुल कार्यरत आहेत; मात्र हिंदूंनाच याबाबत अधिक माहिती नसल्याने किंवा गुरुकुलात शिक्षण घेतल्याने आपले मूल पुढे देव देव करत राहील, मग आपला सांभाळ कोण करेल याचीच चिंता अधिक असल्याने या गुरुकुलात शिक्षण घेणारे मोजकेच विद्यार्थी असतात. आज हिंदूंना त्यांच्या धर्माविषयी माहिती करून घ्यायची असेल, भावी पिढीला सध्याच्या समाजाच्या बिघडलेल्या स्थितीपासून दूर ठेवायचे असेल तर गुरुकुल शिक्षणाशिवाय योग्य पर्याय दुसरा नाही हे लक्षात घ्यायला हवे. हल्ली बहुतांश गुरुकुलांतून धार्मिक शिक्षणासह शालेय शिक्षणही दिले जात असल्याने गुरुकुलात शिक्षण घेणारे विद्यार्थीही डॉक्टर, इंजिनिअर होत आहेत. मुलांवर लहानपणापासून धार्मिक संस्कार केले गेले तर भविष्यात कोणी आपल्या धर्माला, त्यातील शिकवणुकीला आणि ग्रंथ परंपरेला नावे ठेवणार नाही. हिंदू धर्मग्रंथांचे, येथील प्राचीन संस्कृतीचे जे महत्व पाश्च्यात्यांना कळले ते आपल्याला केव्हा कळणार आहे ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारतीच्या शिष्टमंडळाने घेतली शिक्षण मंत्री भुसे यांची भेट

**अक्षराज : दिपक शिवले**
**दि.०५, कळवण (नाशिक) :**
दि.३/८/२०२५ रोजी प्राथमिक शिक्षक भारतीच्या शिष्टमंडळाने शालेय शिक्षण मंत्री नामदार दादासाहेब भुसे,यांची भेट घेऊन वस्तीशाळा शिक्षकांची जुनी सेवा ग्राह्य धरून,जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात चर्चा केली.

यावर भुसे साहेबांनी लवकरच बैठकीचे नियोजन करण्याचे आश्वासन दिले. शिष्टमंडळात प्राथमिक शिक्षक भारतीचे राज्य सरचिटणीस



भरत शेलार, नाशिक जिल्हा अध्यक्ष सुनिल गांगुर्डे राज्य कोषाध्यक्ष किशोर कदम, राज्य संघटक प्रकल्प पाटील, राज्य प्रसिद्धी प्रमुख दिपक पाटील, विभागीय सरचिटणीस निलेश पाटील, नानासाहेब हाडोळे संभाजीनगर, भाऊसाहेब धिवर, वसंत ठोंबरे, गणेश रोठे, जिल्हा संघटक दशरथ गोवेकर, जिल्हा नेते पुरुषोत्तम पाटील आम्रपाल आहेर, कळवण तालुका अध्यक्ष वसंत पवार, कार्याध्यक्ष मन्साराम पवार, मालेगाव तालुका अध्यक्ष निलेश नाहिरे सरचिटणीस भाऊसाहेब कापडणीस, कार्याध्यक्ष अभिजित देसले संतोष चोलके उपस्थित होते.

## शक्त्यवच्छेद..

केलेल्याचुकीबद्दल
कधीतरी वाटो खेद
पहावे वेगळे करुनि
तिरकस वृत्ती छेद

लपेटूनबसे निंदका
शब्दांचा वाढवे मेद
भल्या बु-या मधला
ओळखावे खराभेद

निदानस्वतावर तरी
विश्वासअसो अभेद
कपटी वृत्ती सळाळे
कधी होई शिरच्छेद

पश्चात्ताप बुध्दी भेद
मागेराहतो परिच्छेद
पोसू नकात घरभेदी
बाहेरउसळे अंतर्भेद

उध्वस्त करे स्वप्नांस
सदैव मांडती उच्छेद
ढासळे क्षणैक मनोरे
करून शक्त्यवच्छेद

सत्ता स्वता भयाभीत
होवून जाय समुच्छेद
वाद विवाद मिटवावा
आता आलेला निर्वेद

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# ओटीटी प्लॉटफॉर्मसाठीही सेन्सॉरबोर्ड हवे

कोरोना काळात लॉकडाउन असल्याने चित्रपटगृहे बंद होती अशावेळी नवीन चित्रपटांच्या प्रसारणासाठी निर्माते, दिग्दर्शकांनी ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती दिली. प्रेक्षकांनाही हा नवा पर्याय खूप आवडला कारण चित्रपटगृहात न जाता घरात बसून आपल्या लॅपटॉपवर, कॉम्प्युटरवर किंवा अगदी हातातल्या मोबाईलवर देखील नवा चित्रपट पाहायला मिळू लागला त्यामुळे प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती देऊ लागले. ओटीटी प्लॅटफॉर्मची लोकप्रियता जशी वाढत गेली तसे निर्माते दिग्दर्शक या प्लॅटफॉर्मवर चित्रपट प्रदर्शित करू लागले. त्यातही सलग तीन तास छोट्या स्क्रीनसमोर प्रेक्षकांना बसणे शक्य होत नाही हे लक्षात आल्यावर निर्मात्या दिग्दर्शकांनी त्यालाही पर्याय शोधून काढला तीन तासांचे चित्रपट सहा ते दहा भागात वेबसिरीजच्या रूपात प्रदर्शित करू होऊ लागले. ओटोटीच्या या वेबसिरीजला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. हिंदी वेबसिरीजने तर कमालीची लोकप्रियता मिळवली. या वेबरीजममध्ये चित्रपटसृष्टीतील सर्वच दिग्गज कलाकार भाग घेऊ लागले. चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉरबोर्डची मान्यता आवश्यकता असते. तशी वेबसिरिजना नसते त्यातही या वेबसिरीजचे सर्वाधिक प्रेक्षक हे २० ते ४० या वयोगटातील म्हणजे तरुण असतात. सेन्सॉरबोर्ड नाही आणि प्रेक्षक तरुण मग काय निर्माते दिग्दर्शकांनी वेबसिरीजद्वारे ओटीटी ॲप्सवर अश्लीलतेचा भडिमार सुरू केला. अश्लीलतेचा भडिमार असलेल्या अशा शेकडो ॲप्स ओटोटी प्लॅटफॉर्मवर धुमाकूळ घालू लागल्या. अलीकडील काळात तर अश्लील ओटोटी ॲप्सचा इंटरनेटवर महापूर आला. या ओटोटी ॲप्सवर अश्लीलतेचा अक्षरशः नंगानाच चालू झाला. फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर या



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**




ओटीटी ॲप्स आणि वेबसिरीजची अश्लील दृश्ये मुद्दामहून प्रसारित केली जाऊ लागली जेणेकरून तरुण मुले ही ॲप्स आणि वेबसिरीज पाहतील. तरुण मुलांना अश्लीलतेकडे घेऊन जाणाऱ्या या अश्लील ॲप्सवर आणि वेबसिरीजवर बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वत्र ही मागणी होऊ लागली. संसदेत देखील काही खासदारांनी अश्लील ॲप्सवर बंदी घालावी अशी मागणी केली. काही सुजाण नागरिकांनी त्यासाठी न्यायालयाची दारे देखील ठोठावली. सुजाण नागरिकांच्या या मागणीला अखेर यश मिळाले. मागील आठवड्यात केंद्र सरकारने देशातील २५ ओटीटी ॲप्स वर बंदी घातल्याची घोषणा केली. बंदी घालण्यात आलेल्या ओटीटी ॲप्समध्ये उल्लू, एएलटीटी आणि डिसिफ्लिक सारख्या काही मोठी नावे समाविष्ट आहेत. माहिती प्रसारण मंत्रालयाने यासंदर्भात एक अधिसूचनाही जारी केली आहे. त्यात म्हटले आहे की या निर्णयाचा मुख्य उद्देश अश्लील सामग्रीचा प्रसार रोखणे हा आहे. अशी सामग्री भारतीय कायदेशीर आणि सांस्कृतिक मानकांचे उल्लंघन करणारी मानली जातात. बंदी घालण्यात आलेल्या अन्य ॲप्समध्ये बिगशॉट, बूमएक्स, नवरासा लाईट, गुलाब ॲप, बुल ॲप, जलवा ॲप, कंगन ॲप, वॉव एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिट प्राईम, फेनियो, शोएक्स, सोल टॉकिज, अड्डा टीव्ही, हॉट एक्स, व्हीआयपी, हलचल ॲप, मूड एक्स, निऑन एक्स, फुगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स यांचा समावेश आहे. सरकारने इंटरनेट सेवा प्रदात्यांना भारतात या वेबसाइटवर सार्वजनिक प्रवेश थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. या अश्लील ॲप्सवर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागतच होत आहे. केवळ या २५ ॲप्सवरच नाही तर यासारख्या ज्या ज्या ॲप्सवर अश्लीलतेचा नंगानाच चालू आहे अशा सर्वच ॲप्सवर सरकारने बंदी घालायला हवी. याशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्मवर सुरू असणाऱ्या सर्वच अश्लील वेबसिरिजवर देखील बंदी घालायला हवी. ओटीटी प्लॅटफॉर्मवर चालू असलेल्या अश्लील वेबसिरिज समाजाचा समतोल बिघडवत आहेत. या वेबसिरीज मोबाईलवर पहायला मिळत असल्याने अल्पवयीन मुलेही या वेबसिरीज चवीने पाहत असतात. वेबसिरिजसाठी सेन्सॉरबोर्ड नसल्याने यात काहीही दाखवले जाते. आक्षेपार्ह, अश्लील, लोकांच्या भावना दुखावणारे, भावना चाळवणारे, हिंसेला, व्यसनाला प्रोत्साहन देणारे असे सर्व ज्यांच्यावर सर्वसाधारण स्थितीत बंदी घातली जाऊ शकते किंवा प्रौढांसाठी म्हणून बिरूद लावले जाऊ शकते असे सर्वकाही दाखवले जाते. सेन्सॉरबोर्ड नसल्याने निर्माते दिग्दर्शक आक्षेपार्ह दृश्ये दाखवतात. वेबसिरिजना चित्रपटासारखे स्वतंत्र सेन्सॉरबोर्ड लागू केले तर या गोष्टींना आळा बसेल चित्रपट असो की वेबसिरीज सेन्सॉरबोर्डने मान्यता दिल्याशिवाय ओटोटी प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात येऊ नये.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ठाणे शहर आणि घोडबंदर मार्गावरील रस्त्यांची दुर्दशा

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०४, ठाणे :** ठाणे शहरातील घोडबंदर रोड वरील कासारवडवली ते गायमुख या पट्ट्यात रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली असून तिथून जाताना वाहनांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या मार्गांची प्री कास्ट स्लॅब किंवा पॉलिमरचा वापर करून तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठाणे वाहतूक पोलिसांनी यासाठी नियोजन करून ब्लॉक घेऊन हे काम येत्या काही दिवसात पूर्ण करावे असेही सांगितले.

शहरात पूर्व द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीचे योग्य नियोजन करावे. त्याचप्रमाणे शहरात आणि घोडबंदर मार्गावर अतिरिक्त



वॉर्डन तैनात करून वाहतूक सुरळीत चालू राहील याची दक्षता घेण्याच्या सूचना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मेट्रोच्या कामामुळे अडचण येत असल्यास त्या मार्गावरील बॅरिकेड्स राडारोडा तातडीने हटवण्यात यावा असेही निर्देश याप्रसंगी दिले. भिवंडी-वाडा-मनोर मार्गावर खड्डे पडल्याने त्यात नुकत्याच एका दुचाकीस्वाराला आपला जीव गमवावा लागला होता.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी बोलून या मार्गाच्या कंत्राटदाराचा आर्थिक प्रश्न त्वरित मार्गी लावून हे काम तातडीने सुरू करावे, तसेच या मार्गावरील खड्डे तात्काळ बुजवावेत असे निर्देश देखील याप्रसंगी दिले. यावेळी ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुमरे, ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्त पंकज शिरसाट उपस्थित होते.

# थोडक्यात

## विद्यार्थ्यांनी टिळकांचे चरित्र अभ्यासले पाहिजे : ॲड.भागवत

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.०३, चंद्रपूर :** आजच्या काळात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहेत. चित्त अस्थिर करणाऱ्या अनेक गोष्टी, मोबाईल सारखी साधने भोवताली असताना त्यातून स्वतःला स्थिर करता येणे महत्त्वाचे आहे. त्यासाठीच विद्यार्थ्यांनी टिळकांचे चरित्र अभ्यासले पाहिजे, असे प्रतिपादन लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ रवींद्र भागवत यांनी केले. ते लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. १ ऑगस्ट लोकमान्य टिळक स्मारक मंडळाद्वारे संचालित सर्व विद्यालयातर्फे आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दैनिक लोकसत्ता चे वृत्तसंपादक रवींद्र जुनारकर उपस्थित होते. आपल्या मनोगतात जुनारकर म्हणाले की, सध्या समाज माध्यमांवर महापुरुषांच्या चारित्र्यहननाचे काम सुरू आहे. त्यामुळे सामान्य माणसांनी बोलणे आता आवश्यक झाले आहे. जुनारकर पुढे म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेला अर्थ विचार अतिशय महत्त्वाचा आहे. १०० वर्षांपूर्वी असा विचार करणारे टिळक हे द्रष्टे नेते होते. याप्रसंगी तिन्ही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कु. प्रेरिता भास्कर चौधरी (लोकमान्य टिळक विद्यालय), कु.सुप्रिया प्रकाश तोकलवार (लोकमान्य टिळक कन्या विद्यालय), कु.पूर्वा बालू रूपारेल (लोकमान्य टिळक ज्ञानमंदिर) या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

या प्रसंगी व्यासपीठावर स्मारक मंडळाचे उपाध्यक्ष शीपाद मुनगंटीवार, सचिव गांगेय सराफ विराजमान होते. तर सभागृहात मंडळाचे कोषाध्यक्ष ॲड. प्रशांत घट्टूवार, सहसचिव डॉ. प्रवीण पंत, सदस्य डॉ.राम भारत, ॲड.अभय पाचपोर व दत्तप्रसन्न महादाणी तसेच माजी मुख्याध्यापिका सौ. जया भारत डॉ.सविता भट, चवरे, मंगला बंडीवार, राजनहिरे, वसंत थोटे, दर्शना थोटे, तिन्ही शाळांचे मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मंडळाचे सचिव श्री. गांगेय सराफ यांनी करून दिला. चारही शाळांच्या शैक्षणिक सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचा अहवाल त्यांनी सादर केला तर मंडळाचे उपाध्यक्ष शीपाद मुनगंटीवार यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.तन्वी ठाकरे व पीयूष गोपलानी यांनी केले. तर कु.नंदिनी घटे हिने गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ग्रामदैवत श्री ढोकेश्वराची श्रावणात आराधना; श्रावणानिमिताने महिनाभर भाविकांची अलोट गर्दी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथून ईशान्येस ३ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या प्राचीन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेले देवस्थान शांत आणि निसर्गरम्य परिसरात वसलेले हे पुरातन शिवमंदिर भाविकांसाठी श्रध्देचे स्थान ठरत आहे. त्यामुळे महिनाभर रस्त्यावर भाविकांची रेलचेल बघायला मिळते.

यावर्षी देखील पहिल्या श्रावणी सोमवारपासूनच श्री क्षेत्र ढोकेश्वरला भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. पहाटे ५ वाजता ढोकेश्वर मंदिरातील पिंडीला दही, दुग्ध असा महा जलाभिषेक करून पुजा करण्यात आली. यानंतर डमरू व शंखनाद करत मंदिराचे पुजारी यांनी विधिवत साज चढवला पहाटेपासूनच



आबालवृद्ध भाविकांनी श्रींचे दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती.

हर हर महादेव, बम बम भोले श्री ढोकेश्वर महाराज की जय च्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला आहे. श्रावण महिन्यात ढोकेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनाने भक्तीचा मळा फुलला आहे. श्री ढोकेश्वराचे दर्शनासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागातून शिवभक्तांची गर्दी असते. त्यानिमित्ताने श्री ढोकेश्वर

### ढोकेश्वर यात्रेनिमित्त विशाल भंडारा

**सालाबादप्रमाणे यंदाही येत्या तिसऱ्या श्रावणी सोमवार, दि.११ ऑगस्ट रोजी श्री ढोकेश्वर यात्रेनिमित्ताने टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना विशाल भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आला आहे. तिसऱ्या श्रावणी सोमवारी सकाळपासूनच पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी साबुदाणा खिचडी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

देवस्थान समितीच्या वतीने जय्यत तयारी केली आहे. यंदा श्रावण महिन्यात चार सोमवार आले असून चारही सोमवारी ढोकेश्वर मंदिरातील शिवलिंग पिंडीला आकर्षक फुलांची सजावट केली जाते.

ढोकेश्वर मंदिरात रोज सकाळी श्रींच्या पिंडीला अभिषेक, रुद्राभिषेक, पारायण,पान पुजा, तांदूळ पुजा, सत्यनारायण पूजा असे धार्मिक विधी होत आहेत. सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावण महिन्यात भगवान शिवाची आराधना केली जाते. त्याच पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर परिसरातील ग्रामदैवत श्री ढोकेश्वर महादेवाचे रुप मानले जाते.

त्यामुळे भाविकांची या संपूर्ण महिन्यात श्रींचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची गर्दी असते. विशेषत्वाने श्रावणी सोमवारी पहाटेपासूनच महिला भाविकांची मोठी मांदियाळी या ठिकाणी होत असते.

# ‘स्वातंत्र्य व्याख्यानमाले’ची सुरुवात; गांधी विचारांवर सखोल चिंतन

**अक्षराज : विनायक भोईर**

**दि.०४, उसगाव (पालघर) :** कार्यकर्त्यांनी समाजामध्ये विविध स्तरावर काम करताना केवळ कृतीशील नव्हे, तर वैचारिकदृष्ट्याही प्रगल्भ असावे, या हेतूने श्रमजीवी संघटनेने ‘स्वातंत्र्य व्याख्यानमाले’ची सुरुवात केली असून, या मालिकेतील पहिलं पुष्प गांधी समजून घेताना या विषयावर संपन्न झालं.

या व्याख्यानात सुप्रसिद्ध पत्रकार व विचारवंत डॉ. प्रकाश बाळ यांनी महात्मा गांधींच्या विचारसरणीचा विस्तृत आणि अभ्यासपूर्ण मागोवा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार शरद पाटील यांनी भूषवले. कार्यक्रमाच्या दरम्यान उपस्थित श्रोत्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांचं समर्पक निरसन सतीश कामत यांनी केलं. गांधीविचारांवरील सध्याच्या संभ्रम व अपसमज दूर करत त्यांनी योग्य संदर्भ देत स्पष्टीकरण केलं. कार्यक्रमात पुढे बोलताना श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांनी वर्तमान काळात प्रसारमाध्यमांद्वारे अफवा व खोटी माहिती मोठ्या प्रमाणावर पसरवली जात असल्याकडे लक्ष वेधले. महात्मा गांधींचा काळ वेगळा होता आणि आपला काळ वेगळा आहे. त्या काळात विचारभिन्नता, वाद, मतभेद असणे स्वाभाविक होते.

मात्र,आपला देश स्वातंत्र्य मिळवण्यात ज्यांनी आपले प्राण अर्पण केले – सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, सुखदेव – हे सर्वच पूजनीय आहेत. त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे हेच खरे राष्ट्रप्रेम आहे, असे ठामपणे सांगितले.

याच कार्यक्रमात अध्यक्ष शरद पाटील यांनी ही व्याख्यानमाला अखंडपणे आणि सातत्याने सुरू ठेवावी, अशी विनंती विवेक पंडित यांना केली. समाजाला वैचारिकदृष्ट्या सजग बनवणारा हा उपक्रम फारच उपयुक्त आहे, असेही त्यांनी नमूद केले. या व्याख्यानात विशेषतः




तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विचारांनी सज्ज तरुण पिढी तयार करण्याच्या दिशेने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे, असे अनेकांनी सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन विजय पै. (श्रमजीवी अभ्यासवर्ग) यांनी केले. संविधान सभागृह, पू.शा.गु.प्रशिक्षण केंद्र, उसगाव डोंगरी येथे आयोजित या कार्यक्रमास मोठी उपस्थिती लाभली.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विदयार्थ्यांना पाणी बॉटल वाटप

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**




**दि.४, पालम (परभणी) :** पालम येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेत शालेय विदयार्थ्यांना पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जयंती उत्सव समिती च्या वतीने दिनांक १ ते ४ ऑगस्ट पर्यंत शाहिरी जलसा, सम्शान भूमी येथे वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप यासारखे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अनुषंगाने सोमवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ रोजी पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्रा.कन्या शाळेत पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

यावेळी गट शिक्षणाधिकारी सुभाष आम्ले, कृषि उत्पन्न बाजार समिती चे संचालक गणेश हत्तीआंबीरे, दत्तराव देशमुख, डॉ.प्रशांत दवणे, संदिप हत्तीअंबिरे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन शिंदे, नागनाथ उफाडे, तानाजी खंदारे, रुषीकेश कांबळे, गजानन कांबळे, सचिन शिंदे, मुन्ना गेंदे, तुकाराम शिंदे, मुख्याध्यापक अशोक मुंडकर, यरगलवाड, सोनकांबळे, पातळे यांच्या सह सर्व शिक्षक वृंद व जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, पालक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गव्हर्नमेंट कॉलनीच्या राजाचा पाटपूजन सोहळा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नवी मुंबई :** गणेशोत्सव अवघ्या काहीं दिवसावर येऊन ठेपला असून, सर्वत्र गणेशभक्तांच्या मनात उत्सवाची चाहूल लागली आहे. मुंबईसह नवी मुंबईत ठिकठिकाणी बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरु झाली असून सीबीडी बेलापूर येथील सुखः कर्ता आणि दुःख हर्ता अशी ख्याती असलेल्या शासकीय वसाहतीमधील 'गव्हर्नमेंट कॉलनी'च्या राजाचा पाटपूजन सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या मंडळाचे यंदा ४२वे वर्ष आहे. या भक्तिमय सोहळ्यासाठी, बेलापूर विधानसभा आमदार मंदाताई म्हात्रे उपस्थित होत्या.

यंदा २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थी साजरी होणार असून नवी मुंबईत अनेक ठिकाणी गणरायाचे पाटपूजन सोहळा उत्साहाने पार पडले. विशेष म्हणजे यंदा क्लासिक मित्र मंडळाच्या संकल्पनेतून 'रुजवू मराठी, फुलवू मराठी' या शीर्षकाखाली 'गव्हर्नमेंट कॉलनी'च्या राजाचा पाटपूजन सोहळा पारंपरिक पद्धतीने पूजा अर्चा करून बाप्पाचा जयघोष करीत नवी मुंबईतील प्रसिद्ध 'चांगभलं' ढोल-ताशा पथकाने




आपल्या सादरीकरणाने अवघा परिसर दुमदुमून गेला होता. त्यामुळे या सोहळ्याला खऱ्या अर्थी भक्तीरसाचा रंग चढला होता.

यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. दरम्यान, मराठी भाषा ही भारतातील एक जुनी भाषा असून ती ज्ञानेश्वरीसारखा महातत्त्वज्ञानाचा ग्रंथ लिहून त्यांनी मराठी भाषेचा व संस्कृतीचा पाया घातला. संत साहित्यामुळेच मराठी टिकली. ती भविष्यातही टिकवायला हवी. जर भाषा असेल, तर तुमची संस्कृती टिकेल. तुमची संस्कृती टिकली, तर तुम्हाला सामाजिक, राजकीय ओळख प्राप्त होईल. हा संदेश या सोहळ्याच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न असल्याचं मत क्लासिक मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश भवार यांनी व्यक्त सांगितले.

या सोहळ्याप्रसंगी बेलापूर विधानसभा आमदार मंदाताई म्हात्रे, स्थायी समिती सभापती डॉ. जयाजीनाथ, सीबीडी ट्राफिक पोलिसांचे पोलीस निरीक्षक नाथ लोखंडे, क्लासिक मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश भवार, वैभव रापशे, राजेश आडागळे, प्रमोद हाटे, जयदेव ठाकूर, माजी सचिव प्रवीण हाटे किशोर पाटील, पंकज कदम, सुशील देसाई, संदीप कोळी, बाबू चव्हाण निलेश कदम संतोष कांबळे सौरभ तायडे प्रसन्ना पाटील राम मेस्त्री त्यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आकर्षक राख्यांनी पाटणची बाजारपेठ सजली



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०४, पाटण (सातारा) :** बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण शनिवार, दिनांक ०९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होत आहे. त्यानिमित्त पाटणच्या बाजारपेठेत राख्यांचे स्टॉल सजले असून परगावी असतेल्या भावाला पोस्ट अथवा कुरियरने राखी पाडण्यासाठी महिला राख्या खरेदीसाठी स्टॉलवर येत आहेत.

पारंपरिक गोंडा, दोरी राख्यांबरोबरच फैन्सी व कलात्मक राख्यांना मागणी वाढली आहे. रक्षाबंधनचा सण अवघ्या ५ दिवसांवर आल्याने पाटणच्या बाजारपेठेतील राख्यांची दुकाने सजली आहेत. याचबरोबर पाटणच्या मुख्य बाजारपेठेत जुने बसस्थानक नवीन बस स्थानक झेंडा चौक या परिसरात आकर्षक राख्यांचे स्टॉन लावण्यात आले आहे. परगावी असलेल्या भावाला पोस्टाने आथवा कुरियरने बहीण राखी पाठवत असल्याने जवळपास १० दिवसांपासून शहरातील विविध भागात राखीचे स्टॉल लावण्यात आले आहे. विविध प्रकारच्या रंगीबेरंगी, आकर्षक राख्या विक्रीसाठी दाखल झाल्या असून खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे.

बाजारात एक रूपयांपासून पाचशे रूपयांपर्यंतच्या राख्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. पारंपरिक दोरी, गोंडा, चंदन व स्टोन राख्या बरोबरच रुद्राक्ष, सिल्व्हर, अमेरिकन डायमंड, कुंदन, मेटल, लाईट, म्युझिक,लुम्बा, कपल राखी, राखी डिश, जरदोसी, स्पंज, बादल जरी यांसह शेकडो प्रकारच्या राख्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

सध्या स्मार्ट वॉचचा जमाना असल्याने राख्यांसोबत स्मार्ट वॉचही गिफ्ट म्हणून ठेवण्यात आले आहेत तसेच नक्षीदार पूजा थाळीलाही बहिणीकडून पसंती मिळत आहे. लहान मुलांच्यात टॉईज राख्यांची क्रेझ आहे. त्यामळे टॉईज राख्यांना मागणी वाढली आहे. कार्टूनमधील छोटा भीम, मोटू पतलू सुपरमॅन, डोरेमॉन स्पायडरमॅन कृष्ण, गणेश, यादी प्रकारची मागणी वाढली आहे तर कलात्मक व नाजूक राख्यांनाही मागणी वाढती आहे. बाजारात सध्या एक रूपयापासून ५०० रुपयां पर्यतच्या राख्याविक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

दर वाढल्याने चांदीच्या राख्यांची संख्या घटलीसध्या सोन्या-चांदीच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना सोने-चांदी खरेदी करणे दिव्य वाटत आहे. यापूर्वी शहरातील राखीच्या दुकानात सोन्या चांदीच्या मोठ्या प्रमाणात राख्या विक्रीसाठी ठेवण्यात येत होत्या. मात्र सोन्या चांदीचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने बहुतांश राखी व्यक्सामिकांनी चांदीच्या राख्या विक्रीसाठी ठेवने टाळले आहे. त्यामुळे ज्या बहिणीना यावर्षी सोन्या चांदीची राखी घायची आहे, त्या बहिणीना सोन्या चांदीच्या दुकानात जावे लागेल.

**- अविनाश खंडके (राख्या विक्रेते, पाटण)**